मे.एस.के. असोसिएट केतन वेदपाठक वि.
सोनाली धोडी
सं.फौ.ख. २९८/२०१९
निशाणी क्र. पी –२३ लगत /पी. डब्लयु. १

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १**

नावः केतन शशिकांत वेदपाठक

**आरोपीतर्फे वकिल श्री. ए.बी.पाटिल यांच्यामार्फत साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु**

१. एस.के.असोसिएटस हि प्रोपरायटर फर्म आहे. ( साक्षीदार यांना नि.२३ वरील त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखवण्यात आले) एस.के.असोसिएटस हि प्रोपरायटर फर्म आहे, असे माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी एस के असोसिएटचा मालक आहे असे त्यात नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी एस के असोसीएटचा मालक आहे हे दाखवणारे कोणतेही कागदपत्र मी पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रा सोबत दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी एस.के असोसिएटचा मालक नाही व ती प्रोपरायटर फर्म नाही म्हणून मी या बद्दलचा पुरावा केस कामी दाखल केला नाही.

२. ( साक्षीदार यांना नि.३० वरील धनादेश दाखवण्यात आला) हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये प्रोपरायटरशिप फर्म व माझे स्वतःचे नाव नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपी माझ्या चांगल्या परीचयाच्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यांचे पती सोबत देखिल माझे चांगले संबंध आहेत. मी सिवील कॉँट्रॅक्टर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सिवील कॉँट्रॅक्टर होण्यासाठी इंजिनियर असणे गरजेचे आहे. हे म्हणणे खरे आहे की मी सिवील इंजिनियर नाही. साक्षीदार स्वतः सांगतात की माझी बहिण आर.सी.सी डिझाईनर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सिवील कन्सट्रक्श्न करण्यासाठी सिविल इंजिनियर असणे गरजेचे आहे असा कायदा आहे (आरोपी यांनी बचावाच्या वेळेस, युक्तीवादाच्या वेळेस कायद्याची कागदोत्पत्री पुष्टी करावी.)

३. ( साक्षीदार यांना नि.३२ वरील नोटिस दाखवण्यात आली)

प्रशन – तुम्ही नोटीस मध्ये खोटे नमूद केले आहे की तुम्ही इंजिनियर आहात

उत्तर – खोटे नाही आहे. माझी बहिण सुपरवाईज करते. आम्हि सिव्हिलचे काम करतो.

४. हे म्हणणे खरे नाही की, माझी बहिण इंजिनियर नाही. माझी बहिण इंजिनियर असल्याबद्दलचा कोणताही कागदोपत्री पुरावा मी केस कामी दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की माझी बहिण इंजिनियर नाही व ती आराखडे तयार करुन घेत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हि हाऊसवाईफ आहे. तिचे पती फायनानशियल कंपनी मध्ये कामगार म्हणून कामाला आहे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, बांधकामाचे काम करण्यापूर्वी आम्ही एस्टीमेट देतो.

**( मध्यांतर असल्याने साक्ष तहकूब करण्यात आली)**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

पालघर (**श्रीमती पी. एस. जी. चाळकर**)

दिनांक ०४.०७.२०२५ २ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पालघर.